[redacted]

सहकारी साखर कारखान्यांना लागणारे सुट्टे भाग,रसायने व अत्यावश्यक बाबी खरेदी करण्यासाठी समिती गठीत करण्या बाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय ,ससाका-३११७/२२३१०/प्र.क्र.३५१/३-स
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०००३२
दिनांक: १५ मे ,२००१.

संदर्भ:- शासन निर्णय,सहकार व वस्त्रोद्योग विभाग क्र.सववि-३११७/२२३१०/ प्र.क्र.३५१ / ३-स
२. साखर आयुक्त,महाराष्ट्र राज्य, पुणे,क्रमांक-साआ/कक्ष-१५/ दर करार/५०९३/२०००१, दिनांक ११.४.२००१.

**शासन निर्णय :**

सहकारी साखर कारखान्याना लागणारी यंत्रसामुग्री,यंत्रसामुग्रीचे सुट्टे भाग,भांडार व रसायाने यांची कमी खर्चात व वाजवी भावात अधिकाधिक दर्जेदार वस्तुची खरेदी व्हावी व महाराष्ट्रात एकाच दराने सर्व साखर कारखान्यांनी यापुढे सुध्दा दर करार ( Rate Contract) पध्दतीने करण्यासाठी खालील प्रमाणे समिती गठीत करण्यास शासन मान्यता देत आहे.

| | |
|---|---|
| १. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ,मुंबई | अध्यक्ष |
| २. उपाध्यक्ष (दोन), महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ,मुंबई | सदस्य |
| ३. साखर आयुक्त | सदस्य |
| ४.कार्यकारी संचालक,महाराष्ट्र राज्य साखर कारखाना संघ,मुंबई. | सदस्य |
| ५. कार्यकारी अभियंता,साखर आयुक्तालय,पुणे | सदस्य सचिव |

साखर कारखान्यासाठी दर करार ( Rate Contract ) पध्दत यापुढे चालू राहणार असून,सदर समिती साखर कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री,यंत्रसामुग्रीचे सुट्टे भाग,भांडार व रसायाने वस्तुच्याखरेदी बाबत सविस्तर चर्चा करुन निर्णय घेईल. त्याप्रमाणे खरेदी करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

( वसंत पोरेड्डीवार )
उप सचिव, महाराष्ट्र शासन
सहकार व वस्त्रोद्योग विभाग

प्रत,
१. सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य,पुणे
२. साखर आयुक्त,महाराष्ट्र राज्य,पुणे.
३. कार्यकारी अभियंता ,(साखर) साखर आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे
४. सर्व प्रादेशिक सहसंचालक (साखर)
५. महालेखापाल-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई. (लेखा परीक्षा) (लेखा व अनुज्ञेयता).